# अट्टलमत

नेताजी सुभाष चंद्र बोस जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
- संपादक



RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-१८ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २० ते २६ जानेवारी २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

# मी कुणालाही मोजत नाही; अधिकारी माझ्या मुठीत; हिरापूर-थापटीचे सरपंच राठोडची अहंकारी भाषा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर बीड रोडवरील हिरापूर-थापटी ग्रामपंचायतचे मार्फत नागरिकांना मिळणाऱ्या शासकीय योजनेचा लाभ ही देताना सदरील ग्रामपंचायतचे सरपंच विनोद राठोड हे विहिर अनुदान घेणाऱ्याकडून प्रत्येकी १५ ते २० हजार रूपये घेत आहे. तर घरकुल घेणाऱ्याकडून कमीत कमी ५ हजार घेण्याचा प्रकार सरपंच राठोड हे करीत आहे. शासनातर्फे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विहिर अनुदान देवून आर्थिक मदत करण्याचा हेतू आहे. परंतु सदर हेतुलाच हरताळ फासण्याचा प्रकार राठोड हे करीत आहे. सरपंच राठोड यांनी थापटी तांड्यातील जिल्हा परिषद शाळेची संरक्षण भिंत पाडताना संबंधित विभागाची कोणतीही परवानगी न घेता भिंत पाडून जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान करून स्वत:चा आर्थिक फायदा घेत आहे.



जिल्हा परिषद शाळेत १० वर्षापूर्वी बांधण्यात आलेले शौचालय पाडून त्या ठिकाणी ग्रामपंचायतच्या निधीतून अंगणवाडी बांधताना सदर कामावर निधी खर्च करण्यासाठी संबंधितांकडून परवानगी घेतलेली होती ? १० वर्षापूर्वी ब ांधलेले शौचालय पाडून आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या सरपंच राठोड यांच्याविरूद्ध अद्याप कारवाई झालेली नाही. याबाबत राठोड यांचे कार्यकर्ते सांगतात की, हिरापूर-थापटी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात राठोड जे करतात तेच अंतिम असतात. त्यांच्या मनमानीला आळा घालण्याची हिंमत वरिष्ठ अधिकाऱ्यांत नाही. कारण जे वरिष्ठ अधिकारी कोणतेही शासकीय योजनेला मान्यता देताना पैसे घेतल्याशिवाय कामाला परवानगीच देत नाही. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी भ्रष्टाचारात पूर्णपणे गुंतलेले आहेत ते सरपंच राठोड यांच्याविरूद्ध कारवाई करूच शकत नाही. सरपंच राठोड हे कोणत्याही कामात पैसे घेतल्या शिवाय ग्रामपंचायत हद्दीतील लोकांना शासकीय योजनेचे फायदेच मिळू देत नाही हे संपूर्ण पैठण तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना ही माहित आहे. अशी चर्चा त्यांच्या कार्यकर्त्यांकडूनच सांगितले जात आहे. त्यामुळे संबंधित विभागातील अधिकारी खरेच भ्रष्टाचारात गुंतलेले आहेत का? याची चौकशी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी करतात की हिरापूर- थापटी विभागातीलच नव्हे जिल्हा परिषदेतील इतर ही भ्रष्टाचार करणाऱ्यांना पाठीशी घालतात हे येणाऱ्या काही दिवसातच स्पष्ट होणार आहे यात शंकाच नाही.



## छत्रपती संभाजीनगर-बीड रोडवरील हिरापूर-थापटीचे सरपंच विनोद राठोड यांचा हम करे सो कायदा!

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पैठण तालुक्यातील हिरापूर-थापटी ग्रामपंचायतचे सरपंच विनोद राठोड आणि ग्रामसेविका गव्हाणे मॅडम यांच्या मनमानीपणे काम करण्याच्या वृत्तीला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाठीशी घालण्याचे मुख्य कारण आर्थिकच असून संबंधित ग्रामसेविका व सरपंचांना मनमानेल तशी कामे करा? ग्रामपंचायतचे सदस्य किंवा कोणीही कितीही तक्रारी केल्या तरी तुमच्याविरूद्ध कारवाई होणार नाही, अशी तोंडी हमीच सदरील विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेली आहे का? छत्रपती संभाजीनगर-बीड रोडवरील हिरापूर-थापटीचे सरपंच विनोद राठोड यांचा हम करे सो कायदा!

यापूर्वी ही सरपंच राठोड यांनी मनमानेल कामे करून स्वत:सह त्यांच्या विश्वासातील व्यक्तीचे आर्थिक फायदे करून देण्यासाठी ग्रामपंचायत निधीचा दुरूपयोग केले ला आहे. त्यावेळी ग्रामपंचायतच्या काही सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे यापूर्वी लेखी तक्रार देवूनही कारवाई न झाल्याने त्यांच्या मनमानीपणा करण्याच्या प्रम ाणात वाढच झालेली आहे.

थापटी तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची संरक्षण भिंत व १० वर्षापूर्वी बांधण्यात आलेली शौचालय पाडताना संबंधित खात्याची परवानगी घेण्यात आली होती का? सरपंच राठोड यांच्या मनमानीपणाला लगाम लावण्याऐवजी ग्रामसेवकांनी आर्थिक फायद्यासाठी त्यांना मदतच करीत आहे.

**परवानगी न घेताच कामे करण्याचा सपाटा**
**हिरापूर थापटीच्या सरपंचाचा मनमानी कारभार?**

१० वर्षापूर्वी ब ांधण्यात आलेली शौचालय पाडून त्या ठिकाणी स्वत: आर्थिक फायदा लाटण्यासाठी अंगणवाडी ब ांधण्याचा मुख्य हेतू पैसा कमविणे नसता तर ज्या ठिकाणी नवीन शौचालय बांधण्यात आले त्याच ठिकाणी अंगणवाडी बांधता आली नसती का? ग्रामपंचायतचा निधी विकासात्मक कामे करण्यासाठी आहेत याची जाणीव सरपंच विनोद राठोड आणि ग्रामसेविका गव्हाणे यांना नाही का?

सदरील ग्रामपंचायतचे सरपंच व ग्रामसेविकांना नियमानुसार कामे करण्याऐवजी बेकायदेशीरपणे कामे करण्याचा हेतू केवळ पैसे कमविणे हेच असलयाने हिरापूर-थापटी ग्रामपंचायत अतंर्गतच्या मनमानीपणाच्या कामाचे वेगवेगळे किस्से उघड होवू लागले आहे.

याबाबत सरपंच व ग्रामसेविकांना अट्टलमतच्या प्रतिनिधीने संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही संपर्क न झाल्याने त्यांच्या काळया कारनाम्याब ाबतची भूमिका समजू शकली नाही. सरपंच व ग्रामसेविकांबाब त अट्टलमतमध्ये प्रकाशित केलेल्या बातम्या बाबत जबरदस्त चर्चा सुरू झाली असून त्यांचे वेगवेगळ्या कामातील गैरव्यवहारही उघडकीस येवू लागले आहे. हिरापूर-थापटी येथील सरपंच व ग्रामसेविकांच्या नियमबाह्य कामाची पंचायत समिती व जिल्हा परिषदेतर्फे चौकशी न झाल्यास पंचायत समिती व जिल्हा परिषदेतील संबंधित विभागातील गैरव्यवहार अनेक कर्मचारी व अधिकाऱ्यांना अडचणीत आणण्याची शक्यता वाढली असून चौकशी होते की नाही हे लवकरच कळेल.

मात्र सरपंच व ग्रामसेविकांना नियमबाह्य कामे अंगलट आल्याशिवाय राहणार नाही हे पण निश्चितच आहे, अशी चर्चा सदरील ग्रामपंचायतीच्या नागरिकांकडून ऐकायला मिळू लागले आहे.

१३ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झालेले वृत्त

# संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांविरोधात जनआक्रोश

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

**बीडमधील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली. तसेच परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणांमुळे राज्याचे राजकारण तापले आहे. देशमुख व सूर्यवंशी कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चाला संतोष देशमुख कुटुंबीय, सूर्यवंशी कुटुंबीय उपस्थित आहेत. तसेच मराठा आंदोलक मनोज जरांगे, आनंदराज आंबेडकर, इम्तियाज जलील, अंबादास दानवे, दीपक केदार हे देखील मोर्चात सहभागी झाले होते. शहरातील क्रांती चौक येथून मोर्चाला सुरुवात झाली. विभागीय आयुक्तालयावर धडकला. या पार्श्वभूमीवर शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.**




## एका मोठ्या नेटवर्कने संतोष भैय्याचा जीव घेतला आहे- मनोज जरांगे

बीडमधील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणामुळे राज्याचे राजकारण तापले आहे. देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी भाषण केले. यावेळी बोलताना त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला.

संतोष भैय्याला न्याय मिळाल्या शिवाय आपण त्यांच्या कुटुंबियांच्या मागून एक इंच सुद्धा मागे हटणार नाही, असा विश्वास मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला आहे. आपण ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे असून सूर्यवंशी कुटुंबाच्या पाठीशी देखील आपण आहोत. असे मनोज जरांगे म्हणाले आहेत. सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळवून देण्यासाठी लॉन्ग मार्च मुंबईकडे जाणार आहे. हा लॉन्ग मार्च ज्या रस्त्याने जाणार आहे त्या रस्त्याने लागणाऱ्या सर्व गावातून त्यांच्या नष्ट्याची सोय करून देण्यात यावी अशी मी विनंती करतो. आता आरोपींना अटक झाली आहे. एक जण राहिला आहे, त्याचा शोधही लागेलच. ही एक मोठी साखळी आहे,

आपल्या कल्पनेच्या पलीकडे आहे. कुठल्या सरकारने देखील असे नेटवर्क पहिले नसेल. या नेटवर्कने आपल्या संतोष भैय्याचा जीव घेतला आहे. या नेटवर्कमध्ये वेगवेगळ्या टीम आहेत. खंडणी मागायला वेगळी, अपहरण करायला वेगळी. बलात्कार करणाऱ्या वेगळ्या टीम आहेत, चोरी करणारी वेगळी टीम, आणि या सर्वांना सांभाळणारा एक जण आहे. ज्याने खंडणी मागायला पाठवले तो सगळ्यात मोठा गुन्हेगार आहे, ज्याने खून करणाऱ्याला पाठवले तो सगळ्यात मोठा गुन्हेगार आहे, तो आधी जेलमध्ये गेला पाहिजे. यातील एकही आरोपी सुटणार नाही, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

## मुख्यमंत्र्यांना सत्तेचा माज - आनंदराज आंबेडकर

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येवरून आनंदराज आंबेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर जोरदार टीका केली. सोमनाथ सूर्यवंशीच्या अंगावर काळे-निळे वण होते, त्याला मारहाण झाल्यामुळेच कोठडीत मृत्यू झाला होता, हे स्पष्ट असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर विधानसभेत हास्यास्पद निवेदन दिले. त्यांना सत्तेचा माज आला आहे, असा घणाघात त्यांनी केला. बीड आणि परभणी हत्या प्रकरण हे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवले पाहिजे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

## शैतान आणि हैवानाला देखील लाज वाटली असेल - जलील

एक बात बताना चाहता हूँ, इस बात के अंदर सारी बात छुपी हुई है. उसके कत्ल के उपर मैं चूप था, अब मेरा नंबर आया है. मेरे कत्ल पर तुम चुप हो, कल तुम्हारा नंबर आएगा, असा शेर सांगत इम्तियाज जलील यांनी जनतेला जागृत होण्याचे आवाहन केले. आपल्या सर्वांना बीड आणि परभणी येथील घटनांविरोधात आवाज उठवावा लागेल. संतोष देशमुख यांची ज्या प्रकारे निर्घृण हत्या झाली. एक माणूस दुसऱ्या माणसाला कशाप्रकारे मारू शकतो, हे पाहून शैतान आणि हैवानाला देखील लाज वाटली असेल, असेही जलील म्हणाले.

## धनंजय मुंडेंच्या सर्व कामाला अजित पवारांचे सहकार्य - अंबादास दानवे

आजचा मोर्चा सर्व जातींचा, सर्व धर्माचा, सर्व पक्षांचा मिळून आहे. बीड आणि परभणीतील घटना कोणत्या जातीच्या विषयी घडलेल्या नाहीत. जातीपातीचा संदर्भ न देता खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये गुंडाराज आज चालू आहे. त्या विरोधामध्ये हा मोर्चा काढण्यात आल्याचे अंबादास दानवे म्हणाले. सैफ खानवर हल्ला करणारा आरोपी दोन दिवसात पकडला जातो, पण संतोष देशमुख यांचा खून करणारे लोक ४० दिवसानंतरही अद्याप फरार आहेत. त्यांना पकडता आले नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, अशी टीका अंबादास दानवे यांनी केली. सोमनाथ सूर्यवंशी यांचाही जेलमध्ये खून झाला. पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये सर्व स्पष्ट असताना एका कॉन्स्टेबलवर सरकार कारवाई करत नाही. त्यामुळे हा खून सरकार आश्रित आहे का? असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. हा लढा देखील येणाऱ्या काळात ताकदीने सुरू ठेऊयात, असे अंबादास दानवे म्हणालेत. एकीकडे सरकार राज्यात सर्वात काही सुरळीत चालू असल्याचे म्हणत आहे, पण वाल्मिक कराडवर गुन्हा दाखल करण्यासाठी संतोष देशमुख यांच्या भावाला आंदोलन करावे लागले. वाल्मिक कराडवर मकोका लावण्यासाठी आंदोलन करावे लागते.

### न्याय मिळेपर्यंत समाज थांबणार नाही - धनंजय देशमुख

वेदनेची आणि भावनेची प्रखरता कधीही कमी न होणारी आहे. सगळे लोक हे न्यायाच्या भूमिकेत आहेत. न्याय मिळेपर्यंत आम्ही आणि समाज थांबणार नाही. देशमुख आणि सूर्यवंशी कुटुंबीयांना न्याय मिळणारच आहे. आम्ही त्याच भूमिकेत आहोत. बीड आणि परभणी येथील घटना एवढ्या निंदनीय आहेत, त्यामुळे जनतेमध्ये आक्रोश वाढत जाणार आहे, असे धनंजय देशमुख म्हणाले.

# स्वातंत्र्य लढ्याचा महानायक

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पराक्रमी इतिहासात डोकावले तर एक असामान्य महापुरुष म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नाव डोळ्यांसमोर येते. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अहिंसात्मक मार्ग न स्वीकारता सशस्त्र लढा देऊनच देशाला स्वातंत्र्य मिळेल हे जाणून त्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आझाद हिंद सेनेची स्थापना केली आणि देशाला स्वातंत्र्य देण्यात हातभार लावला. अशा या महानायकाची जयंती २३ जानेवारीला देशभरात सर्वत्र साजरी होत आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिसा या राज्यात कटक या गावी झाला होता. जानकीनाथ बोस आणि प्रभावती दत्त हे त्यांचे माता-पिता. त्यांचे वडील हे सुप्रसिद्ध वकील होते. नेताजी सुभाषचंद्र बोस हे लहाणपणापासूनच एक कट्टर देशभक्त होते. त्यांच्या नसानसांत देशभक्ती भिनली होती. पारतंत्र्याच्या काळात ङ्गतुम मुझे खुन दो, मै तुम्हे आझादी दुंगाङ्ग हे त्यांनी भारतीयांना केलेले आवाहन खूपच उपयुक्त ठरले. लहानपणी, नेताजी सुभाषचंद्र बोस कटकमध्ये रॅवेन्शॉ कॉलेजिएट हायस्कूल नामक शाळेत शिकत होते. या शाळेत त्यांच्या एका शिक्षकाचे नाव वेणीमाधव दास होते. वेणीमाधव दास आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे स्फ्फुल्लिंग जागवत. त्यांनी सुभाषमधली सुप्त देशभक्ती जागृत केली. वयाच्या १५व्या वर्षी, नेताजी सुभाषचंद्र बोस गुरूच्या शोधात हिमालयात गेले होते. गुरूचा हा शोध असफ्फल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून, नेताजी सुभाषचंद्र बोस त्यांचे शिष्य बनले. महाविद्यालयात शिकत असताना, अन्यायाविरुद्ध लढण्याची त्यांची प्रवृत्ती प्रखर झाली. कोलकाता येथे प्रेसिडेन्सी महाविद्यालयात इंग्रज प्राध्यापक ओटेन हे भारतीय विद्यार्थ्यांशी उर्मटपणे वागत असत. म्हणून सुभाष यांनी महाविद्यालयात संप पुकारला होता. इंग्लंडमधील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी इंग्लंडमध्ये राहून इंग्रज सरकारची नोकरी करण्यास नकार दिला व ते मायदेशी परतले.

आपल्या सार्वजनिक जीवनामध्ये सुभाषबाबूंना एकूण ११ वेळा कारावास भोगावा लागला. १९२१ मध्ये त्यांनी ६ महिन्यांचा कारावास भोगला. सुभाषबाबूंचे अनेक क्रांतिकारकांबरोबर मैत्रिपूर्ण संबंध होते आणि स्वातंत्र्य लढ्यात त्यांना क्रांतिकारकांची मदत होती. त्यामुळे ते क्रांतिकारकांचे स्फ्फुर्तिस्थान आहेत असे ठरवून इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना त्यांच्यावर कोणताही खटला न चालवता अनिश्चित कालखंडासाठी मंडालेच्या कारगृहात बंदिस्त केले. मंडाले कारागृहात सुभाषबाबूंची तब्येत बिघडली, त्यांना क्षयरोगाने ग्रासले; परंतु इंग्रज सरकारने त्यांची सुटका करण्यास नकार दिला; परंतु नंतर तुरुंगातच सुभाषबाबूंचा मृत्यू होईल असे वाटल्याने त्यांची कारागृहातून सुटका केली. तुरुंगात असतानाच सुभाषबाबूंची कोलकाताचे महापौर म्हणून निवड झाल्याने सरकारला त्यांची सुटका करणे भाग पडले. वरील प्रकृती अस्वस्थेनंतर त्यांनी युरोपमध्ये जाऊन उपचार घेण्याचे ठरविले. १९३३-१९३६ या काळात युरोपमध्ये त्यांचे वास्तव्य होते. युरोपमधील वास्तव्यात सुभाषबाबूंनी स्वत:च्या तब्येतीची काळजी घेत असतानाच देशकार्यही सुरूच ठेवले. या वास्तव्यात त्यांनी इटलीचे नेते मुसोलिनी यांची अनेकदा भेट घेतली. मुसोलिनी यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यास सर्व सहकार्य देण्याचे वचन दिले. याच काळात आयर्लंडचे नेते व्हॅलेरा सुभाषबाबूंचे मित्र बनले आणि त्यांनीही स्वातंत्र्य लढ्यास पाठिंबा दिला.

भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या प्रयत्नांबाबत सुभाषबाबूंचे महात्मा गांधी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबर मतभेद होते. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यातील अपयशानंतर ब्रिटिशांनी देशभर ब्रिटिश राज घोषित करून सर्व यंत्रणांचा ताबा घेतला होता. स्वातंत्र्यासाठी होणारी सर्व आंदोलने मोडून काढण्यासाठी ठिकठिकाणी गोळीबाराचा वापर केला आणि त्यात असंख्य देशभक्तांना जीव गमवावा लागला. महात्मा गांधींच्या अहिंसेच्या प्रयत्नांना यश येणार नाही. स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढाच द्यावा लागेल. हे जाणणारा एकच दृष्टा, देशभक्त, नेता आणि सेनानी, देशभक्त सुभाषचंद्र बोस यांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी कॉंग्रेस पक्षाचा त्याग केला आणि ३ मे १९३९ रोजी 'फ्फॉरवर्ड ब्लॉक' या नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला आणि सैन्यातून निवृत्त झालेले सैनिक आणि पोलीस अधिकारी यांना एकत्र करून त्यांनी 'आझाद हिंद सेने'ची स्थापना केली आणि ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र लढा देण्यासाठी प्रयत्न केले. त्याचाच एक भाग म्हणून ब्रिटिशांवर दबाव आणण्यासाठी त्यांनी दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांना पराभूत करणाऱ्या जपान आणि जर्मनी या दोन देशांशी संधान बांधले आणि त्यांचा चळवळीस पाठिंबा मिळवला. त्यांच्या मदतीने स्वराज्याची क्रांतिकारी चळवळ प्रखर केली. आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी इतर राष्ट्रांचे लक्ष वेधून घेतले. त्यांची आझाद हिंद सेना अखेर ब्रह्मदेशातून आसामच्या सीमेवर उभी ठाकली. त्यानंतर ब्रिटिशांनी भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेतला आणि स्वतंत्र्य भारतीय प्रजासत्ताक लवकरच अस्तित्वात आले. नेताजींचे स्वातंत्र्य लढ्यातील अतुलनीय योगदान पाहता ते भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे खरेखुरे महानायक होते असेच म्हणावे लागेल. अशा या महानायकाला कोटी कोटी प्रणाम.

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक सुभाषबाबू

**(२३ जानेवारी १८९७ - १८ ऑगस्ट १९४५). भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक नेते आणि आझाद हिंद सेनेचे सरसेनापती. 'नेताजी' ही त्यांना लोकांनी दिलेली उपाधी. सुभाषबाबूंचे घराणे मूळचे माहिनगरचे (बंगाल). त्यांचे वडील जानकीनाथ वकिलीच्या व्यवसायानिमित्त कटकला (ओरिसा) आले. तेथेच सुभाषचंद्रांचा जन्म झाला. आई प्रभावतीदेवींनी बालवयात त्यांच्यावर केलेले संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत महत्त्वाचे आहेत. रॉवेंशा विद्यालयाचे मुख्याध्यापक बेनी माधवदास यांचाही त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला.**



सुभाषबाबूंवर स्वामी रामकृष्ण आणि विवेकानंद यांचा फ्फार मोठा प्रभाव शाळेत असतानाच पडला होता. दोघांच्या अनेक ग्रंथांचे वाचन त्यांनी तेव्हा केले होते. मिशन शाळेत गोऱ्या व हिंदी विद्यार्थ्यांमध्ये करण्यात येणारा भेदाभेद आणि विवेकानंदांचे लिखाण यांमुळे राष्ट्रप्रेम निर्माण झाले व पुढे गोऱ्यांच्या उद्दाम वर्तनाचे (उदा., प्रा. ओटन) प्रसंग अधिकाधिक घडले तसतसे ते वाढत गेले. याउलट विवेकानंद-रामकृष्णांच्या ग्रंथांमुळे त्यांना अत्यंत उत्कट अशी धार्मिक ओढ वाटू लागली. वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच ते कटक आणि नंतर कलकत्त्याला भेटणाऱ्या साधू, बैरागी, योगी इत्यादींना प्रश्न विचारून त्यांच्याकडून आपल्याला खरा मार्ग सापडेल का, याचा शोध घेऊ लागले. ध्यान, हटयोग यांतही त्यांना गोडी वाटू लागली. विषयासक्तीवर पूर्ण नियंत्रण मिळवून साक्षात्कार प्राप्तीचा मार्ग दाखविणारा कोणी गुरू त्यांना या दोन्ही शहरांत भेटला नाही.

कॉलेजमधील पहिले वर्ष संपल्यानंतरच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत सतराव्या वर्षी ते आणि त्यांच्यासारखे त्यांचे चारपाच मित्र गुरूच्या शोधार्थ निघाले. गया, काशी, हरद्वार, हृषिकेश, मथुरा, वृंदावन, दिल्ली, आग्रा इ. ठिकाणी ते सर्वजण हिंडले; परंतु हवा असलेला गुरू तर मिळाला नाहीच उलट तीर्थक्षेत्री जातिपातीचे प्रस्थ, शिवाशीव इ. पाहून त्यांचा भ्रमनिरास झाला. विवेकानंदांच्या शिकवणुकीने त्यांची मानवाच्या समानतेवरील श्रद्धा दृढ झाली.

प्रा. ओटन यांच्या व तशाच एका गोऱ्या प्राध्यापकाच्या उर्मट वर्तवणुकीने अपमानित झालेल्या प्रेसिडेंट कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हरताळ पुकारला. त्याचे नेतृत्व स्वीकारणे सुभाषबाबूंना भाग पडले. पुढील आयुष्याचे वळण लागण्याची ही नांदी होती; पण या प्रकरणी त्यांना महाविद्यालयातून काढून टाकण्यात आले. पुढे अशुतोष मुखर्जींच्या मदतीने त्यांना स्कॉटिश चर्च कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला (१९१७). ते तत्त्वज्ञान विषय घेऊन पहिल्या वर्गात बी.ए. झाले (१९१९). त्याच वर्षी वडिलांच्या इच्छेनुसार ते आयब.सी.एसब.साठी इंग्लंडला गेले. त्या वेळी असहकार आंदोलन सुरू झाले नव्हते. जालियनवाला बाग येथे काय घडले, त्याची पूर्ण कल्पना पंजाब बाहेरच्या लोकांना आली नव्हती. परीक्षेत यश मिळाल्यानंतर हळूहळू सर्व गोष्टी उजेडात आल्या. आंदोलन सुरू झाले, तेव्हा त्यांनी पहिली सक्तीची एक वर्षाची उमेदवारी न करता सरळ नोकरीचा राजीनामा देऊन स्वदेशाची वाट धरली (१९२१). या वेळी महात्मा गांधींच्या असहकार चळवळ जोरात होती. त्यांची भेट घेऊन पुढील दिशा समजावून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महात्मा गांधीनीच त्यांना कलकत्त्याला चित्तरंजन दासांकडे (१९२१) पाठविले. मृत्यूपर्यंत सु. चार वर्षे सुभाषबाबूंचे राजकीय गुरू चित्तरंजनच होते. या सुमारास इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ्फ वेल्सच्या कलकत्त्यामधील आगमनावर बहिष्कार टाकण्याची मोहीम आखण्यात आली. सुभाषबाबूंनी तीत पुढाकार घेतला (१९२१). त्यात त्यांना चित्तरंजन दासांबरोबर सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. तुरुंगात दासांच्या पुरोगामी विचारांचा सुभाषबाबूंवर फार मोठा परिणाम झाला. कारावासानंतर ते काही दिवस बेंगॉल नॅशनल महाविद्यालयाचे प्राचार्य आणि स्वराज्य या वृत्तपत्राचे संपादक होते. पुढे चित्तरंजन दास कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर झाल्यावर सुभाषबाबूंकडे मुख्य अधिकाऱ्याची जबाबदारी आली. ब्रिटिश सरकारने सूडबुद्धीने खोटा आरोप लादून ऑक्टोबर १९२४ मध्ये त्यांना स्थानबद्ध केले. बंगाल प्रांतिक परिषदेमध्ये क्रांतिवीर गोपीनाथ सहा (जो पुढे फ्फाशी गेला) याचा जाहीर गौरव करण्यात आला होता. परिषदेस स्वतंत्र पक्षाचे म्हणजे कौन्सिलमध्ये काम करणाऱ्या कॉंग्रेस गटाचे बहुसंख्य लोक होते. त्यांनीच बंगाल कौन्सिलचे कार्य अशक्य करून टाकले होते. त्यांना खच्ची करण्यासाठी फ्फार व्यापक धरपकडी झाल्या व सर्वांवर, दहशतवादी आंदोलनाशी संबंधित असल्याचे आरोप करण्यात आले. सुभाषबाबूंना अलीपूर, बेऱ्हामपूर, कलकत्ता इ. शहरांतील तुरुंगात काही काळ ठेवून पुढे मंडाल्यासही पाठविण्यात आले. कारावासात त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र, मानसशास्त्र इ. विविध विषयांचे वाचन केले.

दरम्यान चित्तरंजन दास यांचे निधन झाल्याचे त्यांना समजले (१९२५). अशक्त प्रकृती व क्षयाचा विकार यांमुळे सुभाषबाबूंना मुक्त करण्यात आले (१९२७). भारतातील राजकीय परिस्थितीचा सु. सहा महिने अभ्यास करून नंतर ते सक्रिय राजकारणात पडले. ते बंगाल प्रांतिक कॉंग्रेस परिषदेचे अध्यक्ष झाले. त्यांनी यूथ लीग स्थापन करून तरुणांना संघटित केले. कॉंग्रेसचे सरचिटणीस म्हणूनही जवाहरलाल नेहरूंबरोबर त्यांची नियुक्ती झाली (१९२८). दोघांनी मिळून इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना केली (१९२८). त्याच वर्षी कलकत्ता येथील अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्ष मोतीलाल नेहरू यांनी वसाहतीच्या स्वराज्याची मागणी करणारा ठराव कॉंग्रेस अधिवेशनात मांडला. जवाहरलालांसह सुभाषबाबूंनी त्यास विरोध केला आणि पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मांडावा असे सुचविले. पुढे १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या वेळी सुभाषबाबूंना पुन्हा अटक झाली.

२३ जानेवारी १८९७ हा दिवस जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. या दिवशी स्वातंत्र्य चळवळीचे महान नेते सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कटक येथील प्रसिद्ध वकील जानकी नाथ आणि प्रभावती देवी यांच्या पोटी झाला. इंग्रजांच्या दडपशाहीच्या निषेधार्थ त्यांच्या वडिलांनी 'रायबहादूर' ही पदवी परत केली. त्यामुळे सुभाषच्या मनात इंग्रजांबद्दल कटुता रुजली.

आता सुभाष यांनी इंग्रजांना भारतातून हुसकावून लावण्याची आणि भारताला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा घेतली आणि राष्ट्रवादाच्या मार्गावर चालू लागले. आयसीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सुभाष यांनी आयसीएसचा राजीनामा दिला. या गोष्टीवर त्यांच्या वडिलांनी त्यांचे मनोबल वाढवले आणि सांगितले - 'तुम्ही देशसेवेचे व्रत घेतले आहे, तेव्हा या मार्गापासून कधीही विचलित होऊ नका.'

डिसेंबर १९२७ मध्ये कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस बनल्यानंतर १९३८ मध्ये त्यांची कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली. ते म्हणाले होते- महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आपण स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे ही माझी इच्छा आहे. आमचा लढा केवळ ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्ध नाही, तर जागतिक साम्राज्यवादाविरुद्ध आहे. हळुहळू सुभाष यांचा कॉंग्रेसशी भ्रमनिरास होऊ लागला.

१६ मार्च १९३९ रोजी सुभाष यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्य चळवळीला नवा मार्ग देत सुभाष यांनी तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न पूर्ण निष्ठेने सुरू केला. त्याची सुरुवात ४ जुलै १९४३ रोजी सिंगापूर येथे झालेल्या 'भारतीय स्वातंत्र्य परिषदे'ने झाली.

५ जुलै १९४३ रोजी 'आझाद हिंद फ्फौज'ची औपचारिक स्थापना झाली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी आशियातील विविध देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांची परिषद भरवून आणि तात्पुरते स्वतंत्र भारत सरकार स्थापन करून स्वातंत्र्य मिळवण्याचा आपला संकल्प पूर्ण केला.

१२ सप्टेंबर १९४४ रोजी रंगूनच्या ज्युबली हॉलमध्ये हुतात्मा यतिंद्र दास यांच्या स्मृतीदिनानिमित्त नेताजी यांनी अतिशय भावविभोर भाषण केले आणि ते म्हणाले - 'आता आपले स्वातंत्र्य निश्चित आहे, परंतु स्वातंत्र्य बलिदानाची मागणी करते. तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन. भारताच्या इतिहासातच नव्हे तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेलेले हे वाक्य देशातील तरूणाईत प्राण फुंकणारे होते.

१६ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजींचे विमान टोकियोला निघताना तायहोकू विमानतळावर कोसळले आणि १८ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र भारताच्या अमरत्वाची घोषणा करणारे, भारतमातेचे लाडके नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कायमचे निधन झाले, देशभक्तीचा दिव्य प्रकाश प्रज्वलित करून अमर झाले.

# बोअरवेल्स संदर्भात मार्गदर्शक सुचना जारी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

संचालक आपत्ती व्यवस्थापन प्रभाग व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दलाच्या निर्देशानुसार बोअरवेल्स संदर्भात मार्गदर्शक सुचना जारी केल्या असून त्यासंदर्भात वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्व्हेक्षण विभाग यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केल्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

**यासंदर्भात जारी केलेल्या मार्गदर्शक सुचना याप्रमाणे-**

१. उघड्या बोअरवेल यांना अनिवार्य सिल करणे, जेणेकरुन त्याठिकाणी जाण्यास मज्जाव होईल. यासाठी संबंधित जमीन मालक आणि ड्रिलिंग एजन्सी यांची जबाबदारी निश्चित करावी. २. सर्व बोअरवेल्स यांच्या नोंदणीची प्रणाली स्थापन करणे. ३. उघड्या बोअरवेल संबंधी असलेली जोखीम व लहान मुलांची सुरक्षा याबाबत व्यापक जनजागृती मोहिम राबविणे. ४. बोअरवेल ऑपरेटर्स किंवा जमीन मालक यांनी बोअरवेलच्या सभोवताली सुरक्षेच्या अनुषंगाने अडथळे निर्माण करणे. ५. असुरक्षित बोअरवेल ओळखण्यासाठी व त्यासंबंधी निराकरण करण्यासाठी समुदाय संचलित यंत्रणा कार्यान्वित करणे. ६. सर्वोच्च न्यायालय यांनी जारी केल्याप्रमाणे बोअरवेल सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधिताकडून कठोर दंड आकारणी करणे. ७. सुरक्षा नियमांचे पालन होते किंवा कसे याबाबत खात्री करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची नियमित तपासणी करणे. ८. संबंधित अधिकाऱ्यांनी सुरक्षा नियमांचे पालन होत आहे याबाबतची खातरजमा करण्यासाठी नियमित तपासणी करणे.

# ‘क्विक स्टार्ट-२४’ या कंपनीत पैसे गुंतवून ३५ कोटींचा घोटाळा

## प्रतिमहिना ३ टक्के लाभांश आणि विदेशी टूरचे आमिष दिले, कंपनीच्या दोन मालकांसह चार आरोपीवर गुन्हा नोंदवला असून दोघांना अटक करण्यात आली

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

‘क्विक स्टार्ट-२४’ या कंपनीत पैसे गुंतविल्यास प्रतिमहिना ३ टक्के लाभांशासह विदेशी टूरचे आमिष दाखवून जीवन प्राधिकरणाच्या सेवानिवृत्त उपअभियंत्यासह शेकडो लोकांना ३५ कोटींचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला.

ता. १७ मार्च २०२३ ते ता. २८ सप्टेंबर २०२३ दरम्यान हा प्रकार घडला. या प्रकरणात कंपनीच्या दोन मालकांसह जिन्सी पोलिस ठाण्यात दोन शाखा व्यवस्थापकांवर गुन्हा नोंद झाला. दोघा शाखा व्यवस्थापकांना शुक्रवारी रात्री अटक झाली. याप्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सेवानिवृत्त उपअभियंता सरताजसिंग अरजनसिंग चहल (वय ६१, रा. म्हाडा कॉलनी) यांनी दिलेल्या तक्रारीचा आशय असा चहल यांचे बचत खाते हे एका सहकारी बँकेच्या पुंडलिकनगर शाखेत आहे.

फेब्रुवारी २०२३ मध्ये चहल संबंधित बँकेच्या व्यवस्थापकाला भेटले. त्यांनी क्विक स्टार्ट २४ ग्रुपमध्ये (इनलाइफ कॅपशुअर एलएलपी कंपनी) रक्कम गुंतविल्यास ते प्रतिमहिना ३ टक्के लाभांश देतात, असे सांगितले. शिवाय स्वतःच्या खात्याचे पुस्तक दाखविले. चहल यांना त्यांच्यावर विश्वास बसला.

त्यानंतर त्या व्यवस्थापकाने जालना रोडवरील कंपनीच्या शाखेची व्यवस्थापक शीतल सुधाकर मोतिंगे (वय ३२, रा. सिडको एन-२) हिच्याशी भेट घालून दिली.

तिने चहलला कंपनीची सविस्तर माहिती देत हर्षल योगेशभाई गांधी आणि प्रतीक एम. शहा (दोघे रा. गणेश प्लाझा, अहमदाबाद गुजरात) हे दोघे कंपनीचे म ालक असल्याचे सांगितले; तसेच कंपनीची आणखी एक शाखा सिडको एन-७ येथे असून, त्याचे व्यवस्थापक विठ्ठल भागाजी तांदळे (वय ६२, रा. सुरेवाडी, जाधववाडी) असल्याची माहिती दिली. कंपनीमध्ये लोकांनी गुंतविलेली रक्कम ही इतर २४ कंपन्यांमध्ये गुंतवणूक करते.

मिळालेल्या नफ्यावर गुंतवणूकदारांना दर महिन्याला तीन टक्के लाभांश आणि विदेश टूर देते, असे आमिष दाखविले. परतावा भेटत नसल्याने चहल यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून कंपनीचे गांधी आणि शहा (दोघे रा. गणेश प्लाझा, अहमदाबाद गुजरात), एन-७ सिडकोच्या शाखेचा व्यवस्थापक तांदळे (वय ६२, रा. सुरेवाडी, जाधववाडी) आणि जालना रोडवरील शाखेची व्यवस्थापक मोतिंगे यांच्यावर गुन्हा नोंद झाला. यापैकी तांदळे आणि मोतिंगे यांना अटक केली. दोघांना ता. २३ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या प्रकरणात सहायक सरकारी लोकाभियोक्ता आशिष दळे यांनी काम पाहिले.

**परतावा येणे बंद**

चहल यांनी गुंतविलेल्या पैशांवर सहा-सात महिने परतावा आला. त्यांच्या कुटुंबीयांच्या खात्यावर केवळ दोन, तर कोणाचा एकच परतावा आला. चहल कंपनीच्या कार्यालयात गेले, तेव्हा कंपनीचे कार्यालय एन-९ सिडको परिसरात शिफ्ट झाल्याचे चहल यांना समजले.

तेथे मोतिंगे आणि तांदळे दोघे भेटले, त्यांनी पैसे परत मिळतील काळजी करू नका, असे म्हणून वेळ मारून नेली. त्यानंतर चहल यांनी कंपनीच्या मालकांना फ़ोन केला.

मात्र, त्यांचे मोबाइल बंद येत होते. त्याचदरम्यान मोतिंगे हिच्याकडे अशाच प्रकारे सात-आठशे लोकांनी, तर तांदळे याच्याकडे पाचशे लोकांनी गुंतवणूक केली असून, त्यांनी त्यांनाही बनावट अ. ग्रिमेंट करून देत सुमारे ३५ कोटी रुपयांना गंडा घातल्याचे समोर आले.

**चहल कुटुंबीयांचे २१.५० लाख**

चहल यांना कंपनीवर विश्वास बसला आणि त्यांनी २५ मार्च २०२३ ला एक लाख रुपये कंपनीच्या खात्यावर टाकले. त्यांचे अ. ग्रिमेंट झाले, त्यानंतर चहलने मुलगी हरनीष कौर, मुलगा अमनज्योतसिंग, पत्नी जसमित कौर, बहीण परमिंदर कौर आणि भाचा तरणज्योत सिंग रतन अशा सहा जणांचे एकूण २१ लाख ५० हजार रुपये १२ महिने १० दिवसांसाठी कंपनीच्या बँक खात्यावर टाकले.

# चार हजार लाडक्या बहिणींना ‘योजना नको’

## महिलांकडून परत आलेला निधी सरकारी तिजोरीत देण्यात येणार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पात्रता निकषात न बसणाऱ्या महिलांना ‘लाडकी बहीण’ योजनेतून वगळण्यासाठीची पडताळणी मोहीम राबवण्याच्या आधीच राज्यभरातून चार हजारांहून अधिक महिलांनी ‘योजना नको’ असा अर्ज केला आहे. महिला व बालविकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक पातळीवरील शासकीय कार्यालयांत योजनेचे लाभ थांबवण्याची विनंती करणारे अर्ज येत आहेत. पडताळणीत अपात्र ठरल्यास मिळवलेल्या लाभाची रक्कम दंडासहित वसूल करण्यात येण्याच्या भीतीने ही ‘अर्ज माघार’ सुरू असल्याचे दिसून येत आहे. यावरून आता महिला व बालविकास खात्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली.

काही महिलांनी लाभ परत देण्यास सुरुवात केली आहे. गेल्या महिन्यातही काही अर्ज आले होते. या महिन्यातही हे अर्ज येत आहेत. आपण या योजनेसाठी पात्र नाही, असं लक्षात आल्याने काही महिला अर्ज भरून योजनेचा लाभ नाकारत आहेत. त्यामुळे लाडक्या बहिणी प्रामाणिकसुद्धा आहेत, हे यातून सिद्ध होतंय, असं आदिती तटकरे म्हणाल्या. आतापर्यंत चार हजार मागे आले आहेत. परंतु, ही आकडेवारी अंदाजे आहे. डिसेंबरमध्ये १००-१५० प्राप्त झाले होते. जानेवारीत जास्त प्राप्त व्हायला सुरुवात झाली आहे. या महिलांकडून परत आलेला निधी पुन्हा सरकारी तिजोरीत देण्यात येणार आहे. त्यासाठी स्वतंत्र रिफंड हेड तयार करून त्या निधीचा उपयोग लोककल्याणासाठी केला जाणार आहे, असं त्या पुढे म्हणाल्या.

**अर्ज छाननी प्रक्रिया अविरत सुरू राहणार** – पिवळे आणि केशरी रेशनकार्डधारक प्राप्त लाभार्थी महिला वगळता इतर महिलांच्या अर्जाची छाननी करण्यात येणार आहे. याकरता परिवहन आणि प्राप्तिकर विभागाची मदत घेतली जात आहे. त्यामुळे ही अखंड अविरत सुरू राहणारी प्रक्रिया असेल. परिणामी अर्ज मागे घेण्याऱ्या महिलांच्या आकडेवारीत सतत बदल होऊ शकेल, असं आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं.

**पडताळणीपूर्वीच माघार** – महायुती सरकारने गेल्या वर्षी जुलै महिन्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. राज्यातून दोन कोटी ६३ लाख महिलांनी या योजनेसाठी अर्ज केले. दोन कोटी ४७ लाख महिला पात्र ठरल्या. त्यातील दोन कोटी ३४ लाख बहिणींना विधानसभा निवडणुकीअगोदर पाच महिने दरमहा दीड हजार रुपये देण्यात आले. या योजनेचा महायुतीला चांगला फायदा झाला. महायुती सत्तेत आल्यानंतर डिसेंबरचा हप्ताही देण्यात आला. मात्र, या योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर प्रचंड भार पडणार असल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योजनेतील लाभार्थींची पडताळणी करण्याच्या सूचना महिला व बालविकास विभागाला केल्या होत्या. त्यानुसार या विभागाकडून पडताळणी मोहीम राबवण्यात येणार आहे. मात्र, त्यापूर्वीच शेकडो महिलांनी योजनेतून माघार घेण्यासाठी लगबग चालवली आहे.

# न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूल वाहेगाव येथे बाल आनंदनगरी आणि हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

गंगापूर तालुक्यातील वाहेगाव येथील न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूल मध्ये शनिवार दि.१८ जानेवारी २०२५रोजी बाल आनंद नगरी आणि हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता सदर कार्यक्रम प्रसंगी वाहेगावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. रेणुका ताई भडके. सौ. वैशाली मनाल. सौ. ज्योती दारुंटे, सौ. जयश्री दारुंटे, सौ. लता गंगवाल यांनी दीप प्रज्वलन करून तसेच प्रतिमा पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सौ. वर्षा पवार आणि सौ ज्योति दारूंटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास महिला पालकांची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्व महिलांच्या हस्ते रिबीन कापून आनंदनगरीचे उद्घाटन करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्टॉल लावले होते. त्यातून मुलांना व्यवहार ज्ञान मिळण्यास मदत झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या शेतातील वस्तू विक्रीसाठी आणल्या होत्या. पालकांनी मुलांना पुरेपूर प्रतिसाद देऊन वस्तूंची खरेदी केली. हळदी कुंकू कार्यक्रम ाचे प्रास्ताविक प्रास्ताविक आणी सूत्र संचलन सौ. ख्रिस्तिना गणराज यांनी केले. संस्थेच्या संचालिका सौ. संध्या बाबासाहेब हिवाळे तसेच सहशिक्षिका सौ. प्रीती पाटील, सौ. मनीशा उबाळे, सौ. अभिलाषा नजन, कु. प्रियांका हिवाळे, मिस. तगरे. अंजुम शेख. कू. तेजस्विनी वालतूरे यांनी महिलांना वान देउन हळदी कुंकू लावले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा संचालक श्री. बाबासाहेब हिवाळे, मुख्याध्यापक श्री. अरुण शिरसाठ, व्यवस्थापक श्री. दिपक गणराज यांनी मार्गदर्शन केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक श्री. महेश सोनवणे, श्री. विशाल माने, श्री. समीर शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.



**आंबेडकरी विचार मोर्चा प्रणीत आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष मा.नारायण बागडे साहेब यांच्या हस्ते तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यकारिणी यांच्या वतीने मा. सतीश जाधव यांची छत्रपती संभाजीनगर शहर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!**

# ‘कुटुंबाचा सामाजिक उपभोग : आरोग्य’ सर्व्हेक्षण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून राष्ट्रीय नमूना पाहणी ८० वी फेरी ‘कुटुंबाचा सामाजिक उपभोग:आरोग्य’ या विषयावर देशव्यापी पाहणी घेण्यात येत आहे. पाहणी जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत घेण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्याकरीता अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग या पाहणीमध्ये सहभागी होत आहे. या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश आरोग्य क्षेत्राविषयी मुलभूत सांख्यिकी माहिती निर्माण करणे, शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांचे मोजमाप करणे, सरकारी रुग्णालयांचा वापर किती प्रमाणात होतो, सरकारी व खासगी क्षेत्रातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, लसीकरण तसेच १५ ते ४९ वयोगटातील गरोदर महिलांसाठी गर्भावस्थेच्या पूर्व आणि पश्चात घेतलेल्या उपचारांबाबत तपशिलवार माहिती या सर्वेक्षणाच्या माध्यमातून संकलित केली जाणार आहे. पाहणीची माहिती शाश्वत विकास ध्येय अंतर्गत महत्वाचे निर्देशक तयार करण्यासाठी आणि पाहणीचे निष्कर्ष केंद्र व राज्य शासनाला नियोजन व ध्येयधोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे प्रशिक्षित कर्मचारी या पाहणीकरीता माहिती गोळा करत आहेत. हे कर्मचारी शास्त्रोक्त पद्धतीने निवडलेल्या गावांना आणि शहरी भागांना भेट देतात. या भेटीदरम्यान सांख्यिकी पद्धतीचा वापर करुन निवडण्यात आलेल्या कुटुंबाकडून माहिती गोळा करण्यात येत आहे. पाहणी दरम्यान कुटुंबाची संकलित केलेली वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार आहे.

# स्वामित्व योजनेंतर्गत महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच मुख्यमंत्री यांच्या हस्ते सनद वितरण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

स्वामित्व योजनेद्वारे देशातील जनतेच्या उत्पन्नात वाढ होत असून यामुळे त्यांच्या आशा-आकांशा पुर्ण करत आहे. स्वामित्व योजनेंतर्गत जनतेला देण्यात आलेल्या कायदेशीर सनदेमुळे त्यांना मदत होत असून या सनदेच्या आधारे बँकेतून कर्जाद्वारे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितले.

केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सह्याद्री अतिथीगृह येथून ऑनलाईन उपस्थित होते. मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, भूमी अभिलेख जमाबंदी आयुक्त व संचालक डॉ.सुहास दिवसे, विभागीय आयुक्त राजेश देशमुख तसेच पालघर, रायगड, ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी उपस्थित होते.

देशातील गरीबी कमी करायची असेल तर प्रत्येक नागरिकांजवळ मालमत्तेचे अधिकार असणे गरजेचे आहे असे सांगून प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, देशातील लाखभर लोकांकडे संपत्ती असूनही त्यास किंमत मिळत नव्हती. स्वत:चे घर असूनही काही लोक त्यावर कब्जा करत होते. २०१४ पासून आम्ही देशातील नागरिकांचे ड्रोन द्वारे सर्व्हेक्षण करून त्यांना प्रापर्टी कार्ड वितरित करत आहो. यामुळे लोकांचे जीवन बदलणार असल्याचे प्रधानमंत्री यांनी सांगितले. स्वामित्व योजनेंतर्गत या प्रॉपर्टी कार्डमुळे देशातील भ्रष्टचार कमी होणार आहे. आज ९८ टक्के भूमी अभिलेखाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. आज गावोगावी शौचालये, उज्ज्वला गॅस,

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सनद वितरणाचा शुभारंभ




जलपुरवठा, आयुष्यमान, सडके, इंटरनेट, ब्रॉडबँड सोबत कॉमन सर्व्हीस सेंटर या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. शहरामध्ये मिळणाऱ्या सुविधा आता गावात मिळत आहे. देशातील गरीब सशक्त झाला तरच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

**प्रधानमंत्री स्वामित्व योजनेतून ग्रामीण भारताच्या सक्षमीकरणास चालना – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

प्रधानमंत्री स्वामित्व योजनेच्या पथदर्शी प्रकल्पात महाराष्ट्राचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ङ्गसबका साथ, सबका विकास, सबका विश्वासङ्घ असा दृष्टिकोन आहे. ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या प्रगतीचा आधार आहे, ही जाणीव ठेवूनच स्वामित्व योजना आखण्यात आली आहे. राज्यातील सुमारे ६० लाख हून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फ़ायदा होईल. ही योजना केवळ शासकीय उपक्रमापुरती मर्यादित नसून, ती ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय प्रणालीत आमूलाग्र बदल घडविणारी आहे. ग्रामीण भागातील जमिनीच्या मालकीबाबतची अनिश्चितता आणि वाद कमी होणार आहेत. अनेकांना जमिनींचा कायदेशीर हक्क सिद्ध करणे कठीण जाते. यामुळे केवळ न्यायालयीन प्रकरणे वाढतात. अनेकदा विकास प्रक्रियादेखील थांबते. या समस्येचे स्वामित्व योजनेमुळे निराकरण होईल. या योजनेद्वारे गावांतील जमिनींची मोजणी अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाच्या मदतीने केली जाते आणि प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या मालकीच्या जमिनीचे कायदेशीर प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र केवळ मालकीचा पुरावा नसून, त्यामागे आर्थिक सक्षमीकरणाची मोठी संधी ठरेल, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

स्वामित्व योजनेंतर्गत राज्यपाल श्री.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील विनोद आत्माराम पिंपळे, माया विकास पिंपळे, सदानंद वामन पिंपळे, दिलीप यशवंत सपाटे, प्रकाश शांताराम रावते, अलिबाग जिल्ह्यातील रोहण कृष्णा पाटे, शैलेश यशवंत ठाकूर, मिलिंद पांडुरंग पडते, प्रभाकर शांताराम नाईक, अंकुश सिताराम धाके आणि ठाणे जिल्ह्यातील विष्णू चुरू आंबेकर, यमुनाबाई रामचंद्र पाटील, मधुकर तुकाराम पाटील आणि चेतन गजानन पाटील यांना सनद वाटप करण्यात आले.

# महाकुंभमेळा : प्रयागराज येथे भीषण आग, एकापाठोपाठ तीन स्फोट!



**प्रयागराज** – उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभ मेळ्याला भीषण आग लागली आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्याकरता अग्नीशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या आहेत. या आगीचे लोट दूरहून दिसत आहेत.

प्राथमिक अहवालांनुसार, कॅम्प साइटवर आग लागली आणि त्या भागात बसवलेल्या अनेक तंबूंना या आगीने वेढले. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) चे एक पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे. आग विझवण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलीस आणि अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. दरम्यान, आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.

उत्तर प्रदेशचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा इंडियन एक्स्प्रेसला म्हणाले, महाकुंभमध्ये सिलिंडरच्या स्फ़ोटामुळे आग लागली आहे. तर, प्रयागराज झोनचे एडीजी भानू भास्कर यांनी एका न्यूज चॅनलला सांगितले. महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १९ मध्ये दोन-तीन सिलिंडरचा स्फ़ोट झला. त्यामुळे कॅम्पमध्ये मोठी आग लागली. आगीवर नियंत्रण मिळण्यात आले आहे. सर्व लोक सुरक्षित आहेत आणि कोणीही जखमी झालेले नाही. महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १९ मध्ये दोन सिलिंडरचा स्फोट होऊन शिबिरांमध्ये मोठी आग लागली. अग्निशमन दलाचे जवान आग विझवण्याचा प्रयत्न करत आहेत, असे आखाडा पोलिस स्टेशनचे प्रभारी भास्कर मिश्रा यांनी सांगितले.

महाकुंभ २०२५ च्या अधिकृत द हँडलने पोस्ट केले, खूप दुःखद! महाकुंभला लागलेल्या आगीच्या घटनेने सर्वांनाच धक्का बसला आहे. प्रशासन तात्काळ मदत आणि बचाव कार्य करत आहे. आम्ही सर्वांच्या सुरक्षिततेसाठी माँ गंगाकडे प्रार्थना करतो. या पोस्टमध्ये बाधित भागातून काळ्या धुराचे दाट लोट उठत असलेला व्हिडिओ देखील शेअर करण्यात आला आहे.

# स्वामित्व योजना : ग्रामीण अर्थकारणाला मिळेल चालना- इमाव कल्याण मंत्री अतुल सावे

# मालकीचा ठोस पुरावा देणारी घटना- सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

मालमत्तेचा ठोस दस्तऐवज मिळून त्याआधारे विकासासाठी लोक अर्थसहाय्य उपलब्ध करु शकतील. ग्रामपंचायतींचा महसूल वाढून ग्रामीण अर्थकारणाला गति मिळेल, असे प्रतिपादन इतर मागासवर्ग कल्याण व दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी केले.

स्वमित्व योजना म्हणजे जमिन मालमत्तेचा ठोस पुरावा देणारी देशातील एक महत्त्वाची घटना आहे. डिजीटल युगात या डिजीटल दस्तऐवजाला महत्त्व असेल,असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केले. जमिनीच्या अचूक मोजणीमुळे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे,असे खासदार डॉ. भागवत कराड यांनी सांगितले. स्वामित्व योजनेअंतर्गत मालमत्तेचे कार्ड म्हणजेच सनद वितरणाचा आज देशभरात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. दूरदृष्यप्रणालीद्वारे या कार्यक्रमाचे थेट प्रसारण पाहण्याची सुविधा जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच प्रत्येक तालुका मुख्यालयात करुन देण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृहात इतर मागासवर्ग कल्याण व दुग्धविकास मंत्री अतुल सावे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यसभा सदस्य खा. डॉ. भागवत कराड, विभागीय



आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपसंचालक भुमि अभिलेख किशोर जाधव, जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख डॉ. विजय वीर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत चंद्रहार ढोकणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता राजेंद्र देसले यावेळी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्थानिक पातळीवरही मालमत्ताधारकांना प्रातिनिधीक स्वरुपात मालमत्ता कार्ड म्हणजेच सनद वाटप करण्यात आले. कार्यक्रमात बोलतांना मंत्री अतुल सावे म्हणाले की, जमिनीच्या सिमांकनामुळे अनेक प्रश्न निकाली निघतील. हे सर्व्हेक्षण ड्रोनद्वारे झाले असल्याने त्यात अचुकता व पारदर्शकता आहे. आपल्या मालमत्तेचा डिजीटल वैध दाखला आपणास सनद स्वरुपात मिळाल्याने तो आपल्या मालकीचा भक्कम पुरावा होईल. त्यामुळे ग्रामिण भागातील अर्थकारणाला गती मिळेल. ग्रामपंचायतींचा महसूल सुद्धा वाढेल. मालमत्तेच्या आधारे विविध अर्थसहाय्य सुद्धा लोक उपलब्ध करुन घेऊ शकतील. शेतीसोबत जोडधंदा करुन आपले उत्पन्न वाढवू शकतील. मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, मालमत्तेच्या सर्व्हेक्षणामुळे आता मालकीचा अचूक नकाशा आणि ठोस पुरावा मिळेल. जमिनीच्या व्यवहारात होणारे फ़सवणूकीचे प्रकार यामुळे टाळता येऊ शकतील. जमिनीच्या मालकीचा ठोस पुरावा देण्याची ही देशातील महत्वाची घटना असून या योजनेकडे एक मिशन म्हणून पहावे. सध्याच्या डिजीटल युगात जमिनीच्या डिजीटल सर्व्हेक्षणातून तयार झालेले हे उतारे महत्त्वाचे दस्तऐवज ठरतील. खा. डॉ. कराड म्हणाले की, देशातील जमिन मोजणी आणि सिमांकनामुळे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. ग्रामिण भागात आपल्या मालमत्तेच्या आधारे विविध उद्योग व्यवसायांना अर्थसहाय्य उभे करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अतिक्रमण, अवैध कब्जा या सारख्या अपप्रवृत्तींना आळा बसून ग्रामिण भागातील विकासाचे नेमके नियोजन करता येणार आहे. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनीही या योजनेचे कामकाज जिल्ह्यात व विभागात चांगले झाले असून यामुळे मालमत्ताविषयक अनेक प्रश्न निकाली निघण्यास मदत होईल,असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. विजय वीर यांनी माहिती दिली की, स्वामित्व योजना ही ग्रामिण भागामध्ये सुधारीत तंत्रज्ञानासह, सर्व्हेक्षण आणि मॅपिंग अर्थात मालमत्तेचे सर्व्हेक्षण करणारी केंद्र पुरस्कृत योजना आहे. जमिन मालकाला त्याच्या जमिनीचा कायदेशीर रितसर हक्क मिळवून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. जिल्ह्यात ९२५ गावांपैकी ७२७गावांमध्ये ही मोजणी पूर्ण झाली आहे. तर १ लाख १३ हजार प्रॉपर्टी कार्डस तयार झाले आहे. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना सनद वितरण करण्यात आले. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे दिल्ली येथून झालेले संबोधनही उपस्थितांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे पाहिले. सुत्रसंचालन प्रशांत जोशी यांनी केले.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.